# AVISHKAR MAHOTSAV

**लोकमत**

## ‘पीईएस’मध्ये रविवारी आविष्कार महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे आणि पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने १० नोव्हेंबर रोजी पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात आविष्कार महोत्सवाचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर, जालना आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांतील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आदी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी असणार आहे.

राज्यपातळीवर कुलपती कार्यालयातर्फे प्रत्येक वर्षी संशोधनासाठी आविष्कार महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाचा संघ त्यात सहभाग नोंदवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातर्फे विभागीय पातळीवरील आविष्कार महोत्सव पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडणार आहे. त्यामध्ये तीन जिल्ह्यांतील २१ महाविद्यालयांतील १७८ विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

ही स्पर्धा महाविद्यालय, विभाग, विद्यापीठ आणि राज्यस्तरावर घेण्यात येत असते. त्यात विभागस्तरावरील स्पर्धा पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात होत आहे. त्यात शहरातील विज्ञानवादी नागरिकांनी विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन पाहण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेला समन्वयक प्रा. प्रशांत पंडित, प्रीती घुगे यांची उपस्थिती होती.

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 6 Nov 08, 2024
Powered by: erelego.com

छत्रपती संभाजीनगर शहर TODAY

### अवतीभवती

## पीईएस अभियांत्रिकीकडे ‘आविष्कार’चे यजमानपद

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने ‘आविष्कार’ स्पर्धेचे यजमानपद पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळाले आहे. विभागीय स्तरावर रविवारी (ता. १०) आयोजित स्पर्धेत तीन जिल्ह्यांतून २१ महाविद्यालयांचे १७८ विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. अहिल्यानगर, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतून विद्यार्थी सहभागी होणार आहेत. फेज १ महाविद्यालय स्तर, फेज २ विभाग स्तर (जिल्हा स्तर), फेज ३ विद्यापीठ स्तर आणि फेज ४ राज्य स्तर असे स्पर्धेचे स्वरूप आहे. या स्पर्धेत कोणत्याही शाखेतील विद्यार्थी कोणत्याही एका वर्गात सहभागी होऊ शकतो. सहभागी विद्यार्थी आपले प्रकल्प पोस्टर किंवा मॉडेलद्वारे प्रदर्शित करणार आहे. या क्षेत्रीयस्तर स्पर्धेत निवड झालेल्या प्रकल्पांना पुढच्या फेज तीनसाठी विद्यापीठस्तरावरील स्पर्धेत सहभागी होता येईल, असे डॉ. वाडेकर यांनी सांगितले.

## धर्मतीर्थ क्षेत्रावर कलश निष्ठापना महोत्सव

**छत्रपती संभाजीनगर :** कचनेरपासून जवळ असलेल्या धर्मतीर्थ क्षेत्रावर रविवारी (ता. १०) आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव ससंघाचा पिच्छी परिवर्तन व वर्षायोग कलश निष्ठापना महोत्सव होणार आहे. यासाठी शहराच्या विविध भागांतून मोफत बसेसची

mtaurangabad@timesofindia.com

## विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे होणार सादरीकरण

**दहा नोव्हेंबरपासून ‘आविष्कार’**

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे १० नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय आंतरविद्यापीठीय संशोधन स्पर्धा ‘अविष्कार’ आयोजित करण्यात आला आहे. राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धेचे यजमानपद यंदा पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळाल्याची माहिती प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर, समन्वयक प्रा. प्रशांत पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठ, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण वैज्ञानिक प्रतिभा आणि क्षमता ओळखणे, संशोधनाची वृत्ती निर्माण व्हावी या हेतूने अविष्कार स्पर्धा भरविण्यात येते. निवडक तरुण संशोधक आणि शिक्षकांना नावीन्यपूर्ण संशोधन विकासासाठी शिष्यवृत्ती स्वरूपात आर्थिक साह्यही प्रदान केले जाते. छत्रपती संभाजीनगरमध्ये होणाऱ्या स्पर्धेत अहिल्यानगर, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, मानव्यविद्या, भाषा, ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन, विधी, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन अशा विविध शाखेतील २१ महाविद्यालयातील सुमारे दोनशे विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली असणार आहे. स्पर्धेचे महाविद्यालय, क्षेत्रीय, विद्यापीठ आणि राज्य असे आहे. सहभागी विद्यार्थी आपले प्रकल्प पोस्टर किंवा मॉडेलद्वारे

प्रदर्शित करू शकतात. या क्षेत्रीय स्तरावरील स्पर्धेतून निवडलेले प्रकल्प विद्यापीठ स्तरावर स्पर्धेत सहभागी होती आणि त्यानंतर राज्यस्तरावर स्पर्धा होते.

DATE:10/11/2024